सकाळ : शुक्रवार ४ सप्टेंबर १९८७

# चार पंक्चर आणि देवदूत

**एक दिवस असा येतो...**

**डॉ. जयंत नारळीकर**
मुंबई

**हा** अनुभव माझ्या लहानपणीचा आहे. मी त्यावेळी सुमारे बारा वर्षांचा असेन...

माझे बालपण बनारस हिंदू युनिव्हर्सिटीच्या परिसरात गेले. १९५० च्या सुमारास बनारस शहरात मोटर कार, बसेस वगैरे फारच थोड्या संख्येने पाहायला मिळत. युनिव्हर्सिटीच्या आवारातील मोटारी हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या असतील. आमच्याकडे मोटार नव्हती व त्यामुळे मोटारीतून बसायला मिळणे ही एक नवलाईची गोष्ट असे. गंमत म्हणून वर्षातून एक-दोन वेळा आम्ही पंधरा-वीस मैलांच्या अंतरापर्यंत भाड्याच्या कारने ट्रिप करून येत होतो. बुद्धकालीन अवशेषांसाठी प्रसिद्ध असलेले सारनाथ किंवा आगगाड्यांचे जंक्शन मोगलसराई स्टेशन ही आमची अशा ट्रिपसाठी आवडती स्थाने होती.

पण एक दिवस आम्ही ठरवले, की याहून लांबची ट्रिप करावी. मिर्जापूरजवळ चुनारचा जुना किल्ला पाहून विंध्यवासिनी अष्टभुजा देवीचे दर्शन घेऊन यावे. चांगली शंभर-दीडशे मैलांची रपेट होणार होती व सकाळपासून संध्याकाळपर्यंत कारमध्ये बसायला मिळणार म्हणून मी व माझा धाकटा भाऊ अनंत आनंदात होतो. इंग्लंडहून उच्च शिक्षण घेऊन नुकतेच परत आलेले आमचे वसंतमामा (प्रा. वसंतराव हुजूरबाजार) हे पण ट्रिपला येणार म्हणून अधिकच मजा !

नेहमीच्या ट्रिपसाठी जी गाडी आम्ही भाड्याने घेत होतो तीच त्यावेळी पण होती. अमेरिकन 'मर्क्युरी' चे ऐसपैस मॉडेल आणि ड्रायव्हरदेखील ओळखीचा. वाटेत पिकनिकसाठी भरपूर सामान बरोबर घेतले. अशा तऱ्हेने स्वारीची आखणी व्यवस्थित झाली. किती वाजता कुठे पोहोचायचे, याचे वेळापत्रक पण आखले.

पण आखलेल्या वेळापत्रकाप्रमाणे नेहमीच घडते, असे नाही !

सकाळी ठरलेल्या वेळी ड्रायव्हर मोटार घेऊन हजर झाला. त्याने बरोबर एक सहकारी--त्याचा भाचा बनवारी---पण बरोबर आणला होता. मोटारीत एक जागा तो अडवणार म्हणून आम्ही दोघे थोडे खट्टू झालो खरे. पण तो खिडकीची जागा अडवणार नसल्याने आमचे काही बिघडणार नव्हते (---आणि पुढे ट्रिपमध्ये त्याचाही उपयोग झाला. अर्थात निघताना आम्हाला त्याची कल्पना नव्हती.)

वेळापत्रकाप्रमाणे आम्ही पहाटे बाहेर पडलो. वाराणसीचा परिसर मागे टाकून मिर्जापूरच्या रस्त्याला लागलो. कोवळ्या सूर्यप्रकाशात आजूबाजूचे निसर्गसौंदर्य पाहत जायला मजा वाटत होती. मागल्या खिडकीतून पाहिले, की धुळीच्या ढगातून पलीकडले काही [illegible] नव्हते. रस्त्यात धक्के बसत होते, त्याची आम्हा दोघांना गंमत वाटत होती.

पण प्रवासातला पहिला खरा धक्का आम्हाला मिर्जापूरच्या आधीच लागला.

ड्रायव्हरने एकाएकी कार थांबवून रस्त्याच्या बाजूला नेली--ढकलत !

"साब, टायर बर्स्ट हो गया"

त्या रस्त्यावर इतका वेळ टायर शाबूत राहिले हे नवलच, असे आता वाटते. त्यावेळी ही काय ब्याद आली, असे वाटले. पण, ड्रायव्हरने 'बनवारी'च्या मदतीने स्टेपनी काढून चाक बदलले. "मिर्जापूर में टायर ठीक कर लेंगे," असे म्हणून त्याने गाडी सुरू केली.

मिर्जापूरजवळ त्याने पंक्चर झालेली ट्यूब रबरी ठिगळ लावून दुरुस्त केली. हा त्याचा दूरदर्शीपणा ठरला.

कारण चुनार गावाजवळ गेल्यावर दुसऱ्या चाकात पंक्चर झाले !

पुन्हा चाक बदलायचा कार्यक्रम आणि तेथील किल्ला पाहिल्यानंतर पंक्चरची दुरुस्ती---मग पुढे विंध्यवासिनीचे दर्शन आणि पिकनिक.

-आणि मग पुन्हा पंक्चर !

आता मात्र दुरुस्तीला वाव नव्हता. उरलेले चांगले चाक चढवून ड्रायव्हरने गाडी परतीच्या दिशेने चालू केली. आता पुन्हा पंक्चर झाले तर बदली चाक जवळ नाही, याची आम्हा सर्वांना जाणीव होती.

"एकाच दिवशी चार वेळा चाक पंक्चर व्हायची संभाव्यता कमीच म्हटली पाहिजे," प्रॉबॅबिलिटी थियरी वर केंब्रिजची डॉक्टरेट मिळालेले वसंतमामा म्हणाले. पण....

"साब, पंक्चर हो गया" तीन वेळा ऐकलेली बातमी पुन्हा ऐकण्याचे त्या दिवशी आमच्या नशिबी होते. टायरमध्ये गवत भरून कार चालवायचा ड्रायव्हर आणि बनवारी यांचा प्रयत्न निष्फळ ठरला.

रस्त्यावर वर्दळ जवळजवळ नव्हतीच. त्यामुळे कोणाशी व कसा संपर्क साधायचा या विवंचनेत वडील मंडळी होती. हिवाळ्याचे दिवस, त्यामुळे लवकर अंधार पडणार ! आणि या भागातून चोर-लुटारूंच्या गोष्टी पण ऐकू येत.

इतक्यात कुठून तरी एक माणूस हजर झाला. "साहेब, तुम्ही माझ्या घरी चला--- इथून अर्ध्या मैलावर मी राहतो. तिथे चहा घ्या आणि मोगलसराईची बस पकडा. ती तासाभरानं इकडून जाईल."

आम्हाला त्याचे आगमन देवदूताप्रमाणे वाटले. त्याच्याबरोबर आमचे सामान घेऊन आम्ही गेलो. ड्रायव्हर आणि बनवारी कारबरोबर थांबले.

"हा माणूस खरोखर देवदूता सारखा आहे, का लुबाडणारा भामटा असेल," अशी शंका वसंतमामांनी व्यक्त केली. पण माझ्या आई-वडिलांनी त्याच्या माणुसकीवर विश्वास टाकायचे ठरवले. हा विश्वास सार्थ ठरला. त्या गृहस्थांनी आमचे आदरातिथ्य करून आम्हाला बसमध्ये बसवून दिले.

बसने आम्ही वाराणसीजवळ आलो आणि गंगेवरचा मालवीय पूल पायी ओलांडून (-कारण रात्री वाहतुकीसाठी तो बंद असे) आम्ही काशी रेल्वे स्टेशनवर पोहोचलो. तेथून रिक्षाने घरी पोहोचेपर्यंत मध्यरात्र उलटून गेली होती.

आज टांड्या फॉल्स आणि विंध्यवासिनीच्या आठवणी पुसट होत चालल्यायत, पण चार पंक्चर आणि देवदूत यांची आठवण मात्र ताजी आहे.

**(उद्या : डॉ. वि. म. कुलकर्णी)**